माहितीचा
अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (वाहन)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०३०/२०१७-१८
दि.१७/०३/२०१८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (वाहन), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

ok

श्री.कृष्णा सी. गुप्ता, ................अपिलार्थी
एस-१०६/सी, पाटाडिया कॉम्प्लेक्स,
उत्तन रोड, भाईंदर (प.) ४०११०१.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
विभागप्रमुख (वाहन)

## -: विवेचन :-

श्री.कृष्णा सी. गुप्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (वाहन) यांचेकडे दि.१४/१२/२०१७ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

a) Give me the List of all Cars/Jeeps, etc. which are provided to the officers of MBMC along with the Car number/name and detail of their concerned Officer holder.
b) Give the total amount of contract for this year and agreement copy.
c) Give me the copy of GR, departmental circular, or any guideline rule stated for the Car facility in MBMC or guidelines/terms and condition for the use of those official Cars.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.१७/०२/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (वाहन) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (वाहन) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१७/०३/२०१८ रोजी दुपारी १२.१० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.वाहन/२३३/२०१८ दि.२८/०२/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (वाहन) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.१४/१२/२०१७ रोजीच्या पत्रानुसार मला माहिती दिलेली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना ई-मेल आयडीवर माहिती देण्यात आली असुन पुनश्च: माहिती उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (वाहन) यांनी अपिलार्थी अर्जदारास ७ दिवसांत माहिती सत्यप्रत करुन विनाशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (वाहन)
मिरा भाईंदर महानगरपालिका

O/C

प्रति:-

१) श्री.कृष्णा सी. गुप्ता,
एस-१०६/सी, पाटाडिया कॉम्प्लेक्स,
उत्तन रोड, भाईंदर (प.) ४०११०१.

१९/३/१८

२) जन माहिती अधिकारी तथा
विभागप्रमुख (वाहन).

१९/३/१८

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (वाहन) यांचे कार्यालय.